**कुलपतींकडून घोषणा :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी कोल्हापूर जिल्ह्याला प्रथमच संधी

# डी. टी. शिर्के नवे कुलगुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तेराव्या कुलगुरुपदी डॉ. दिगंबर तुकाराम तथा डी. टी. शिर्के यांची मंगळवारी निवड झाली. कुलपती तथा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी त्यांच्या नावाची घोषणा केली. ५५ वर्षीय डॉ. शिर्के यांच्या निवडीमुळे विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच कोल्हापूर जिल्ह्याला कुलगुरुपदाची संधी मिळाली. डॉ. शिर्के हे सध्या विद्यापीठातील संख्याशास्त्र विभागात वरिष्ठ प्राध्यापक आहेत. त्यांनी यापूर्वी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरु, कुलसचिव या पदांवर काम केले आहे. उत्तम शैक्षणिक गुणवत्ता व जोडीला प्रशासनाचा चांगला अनुभव याचा विचार होऊन त्यांना ही संधी मिळाली. ते मूळचे हातकणंगले तालुक्यातील वाठार तर्फ वडगावचे आहेत.

कुलपतींच्या विशेष सचिवांनी या निवडीबाबतचा ई-मेल राजभवनातून रात्री आठ वाजता विद्यापीठाला पाठविला. या कुलगुरु निवडीसाठीच्या त्रिसदस्यीय समितीने निवडलेल्या अंतिम पाच उमेदवारांच्या मुलाखती कुलपती कोश्यारी यांनी सोमवारी (दि. ५) ऑनलाईन पद्धतीने घेतल्या. त्यामध्ये डॉ. शिर्के यांच्यासह मुंबईतील नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. नितीन देसाई, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील (पान ८ वर)



आदित्य वेल्हाळ

शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांची कुलगुरु म्हणून निवड झाल्यानंतर विद्यापीठाच्या परिसरात मंगळवारी रात्री टिपलेली त्यांची ही प्रसन्न व आनंदी मुद्रा.

शिवाजी विद्यापीठामध्ये महत्त्वाच्या जबाबदाऱ्या प्रशासनाने विश्वासाने सोपवल्या व त्यांना सर्वतोपरी न्याय देण्याचा सातत्याने प्रयत्न केला. या प्रामाणिक प्रयत्नांचे फलित म्हणून कुलगुरुपदाची संधी मिळाली. पारदर्शी, नियमाला धरुन काम करताना विद्यापीठाचा समृद्ध शैक्षणिक वारसा वृद्धिंगत करण्यासाठी माझा प्रयत्न राहील. समाजाशी नाळ जोडणारे विद्यापीठ ही प्रतिमा यापुढेही जपू.

**- डॉ. डी. टी. शिर्के**

नूतन कुलगुरु शिवाजी विद्यापीठ

शेतकऱ्याचा मुलगा झाला गुणवत्तेमुळे कुलगुरु - वृत्त /८ वर

# डी. टी. शिर्के शिवाजी विद्यापीठाचे नवे कुलगुरु

(पान १ वरुन)

संगणकशास्त्राचे प्रा. डॉ. के. व्ही. काळे, पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील मानव्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे, रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. अविनाश कुंभार यांचा समावेश होता. त्यातील डॉ. शिर्के यांची कुलगुरुपदावर पाच वर्षांसाठी नियुक्ती झाली. त्यांना शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील ३३ वर्षांचा अनुभव आहे.

कुलगुरुपदासाठीच्या अंतिम पाच उमेदवारांमध्ये त्यांची पहिल्यांदाच निवड झाली होती. शांत व संयमी स्वभावाचे असलेले शिर्के हे सर्व घटकांशी समन्वयाने काम करणारे आहेत.

# शिवाजी विद्यापीठाचे नवे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे १३ वे कुलगुरू म्हणून विद्यापीठातील सांख्यिकी विभागाचे वरिष्ठ प्रा. डॉ. दिगंबर तुकाराम ऊर्फ डी. टी. शिर्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल व कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी (दि. ६) डॉ. शिर्के यांच्या नियुक्तीची घोषणा केली. पाच वर्षांच्या कालावधीसाठी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तत्कालीन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाल १७ जून रोजी संपल्यामुळे हे पद रिक्त झाले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचेकडे विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. कुलगुरूंच्या निवडीसाठी राज्यपालांकडून संरक्षण संशोधन व विकास संघटनेचे अध्यक्ष डॉ. जी. सतीश रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय शोध समिती नेमण्यात आली होती. यामध्ये राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे **पान २ वर** ▸



**सर्वसमावेशक प्रशासन चालविण्यावर भर** / पान ५

**अधिविभागातील प्राध्यापकास कुलगुरू होण्याचा दुसऱ्यांदा मान** / पान ५

# शिवाजी विद्यापीठाचे नवे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

(पान १ वरून) संचालक डॉ. अश्विनीकुमार नांगिया, राज्याच्या वन विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर यांचा समावेश होता. त्रिसदस्यीय कुलगुरू निवड शोध समितीकडून २ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले. राज्यभरातून १६९ उमेदवारांनी अर्ज केले. शोध समितीकडून सप्टेंबरअखेर व्ही. सी.द्वारे २५ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह डॉ. नितीन देसाई (मुंबई), डॉ. कारभारी काळे (औरंगाबाद), डॉ. अविनाश कुंभार, डॉ. अंजली कुरणे (पुणे) यांची नावे निश्चित करून राज्यपाल कार्यालयास पाठविण्यात आली. कुलगुरू पदासाठी ५ ऑक्टोबर रोजी पात्र पाच उमेदवारांच्या राज्यपाल यांनी मुलाखती घेतल्या. मुलाखतीनंतर राज्यपाल यांनी मंगळवारी डॉ. शिर्के यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

**सर्व घटकांना सोबत घेऊन काम करणार : डॉ. डी. टी. शिर्के**

शिवाजी विद्यापीठामध्ये अध्यापक, विभागप्रमुख, विविध अधिकार मंडळांवर सदस्य, कुलसचिव व प्र-कुलगुरू अशा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या ज्या विश्वासाने आपल्यावर सोपविण्यात आल्या, त्यांना सर्वतोपरी न्याय देण्याचा प्रयत्न केला. प्रामाणिक प्रयत्नांचे फलित म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची जबाबदारी आपल्याकडे आली आहे, अशी कृतज्ञतेची भावना आपल्या मनात आहे. याच कृतार्थ भावनेतून विद्यापीठाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विद्यापीठाशी संबंधित सर्व घटकांसह समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विद्यार्थी हितासाठी कारकीर्द समर्पित राहील. शिवाजी विद्यापीठाला देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठ बनविण्याच्या कामी समाजातील सर्वच घटकांचे सहकार्य लाभेल, अशी अपेक्षा डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

## आतापर्यंतचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू..

१) डॉ. आप्पासाहेब पवार : २०/९/१९६२ ते २०/१/१९७५
२) बॅ. पी. जी. पाटील : २१/१/१९७५ ते १६/४/१९७८
३) प्राचार्य बी. एस. भणगे : १७/४/१९७८ ते २८/३/१९८०
४) प्राचार्य आर. के. कणबरकर : २२/९/१९८० ते २१/९/१९८३
५) प्राचार्य के.भोगिशयन : २२/९/१९८३ ते २१/९/१९८६
६) प्रो. के. बी. पोवार : २२/९/१९८६ ते २१/९/१९९२
७) डॉ. ए. टी. वरुटे : २२/९/१९९२ ते १५/६/१९९५
८) प्रो. डी. एन. धनागरे : १/११/१९९५ ते ३१/१०/२०००
९) प्रा. डॉ. एम. जी. ताकवले : १/११/२००० ते ११/३/२००४
१०) प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे : ११/६/२००४ ते २/३/२००९
११) प्रो. डॉ. एन. जे. पवार : २६/२/२०१० ते २५/२/२०१५
१२) प्रो. डॉ. देवानंद शिंदे : १८/६/२०१५ ते १७/६/२०२०
१३) प्रा. डॉ. डी. टी. शिर्के : ६/१०/२०२० पासून पुढे

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील सांख्यिकी विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. दिगंबर तुकाराम शिर्के यांची शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यपाल तथा कुलपती



भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी (दि. ६) डॉ. शिर्के यांच्या नियुक्तीची घोषणा केली. डॉ. शिर्के यांची नियुक्ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी ▶▶ पान ७ वर

## विद्यार्थी ते कुलगुरु

नूतन कुलगुरु डॉ. शिर्के हे शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. विद्यापीठाच्या सांख्यिकी विभागात ते अध्यापनाचे कार्य करत होते. प्र-कुलगुरु म्हणून त्यांनी यापूर्वी उत्तम काम केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासनाचा अनुभव डॉ. शिर्के यांना असल्याने त्यांच्या निवडीबद्दल शैक्षणिक क्षेत्रातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. डी. टी. शिर्के

(पान १ वरून) करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाळ दि. १७ जून रोजी संपल्यामुळे हे पद रिक्त झाले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. डॉ. शिर्के (जन्म ११ जून १९६५) यांनी शिवाजी विद्यापीठातून सांख्यिकी विषयात पदव्युत्तर पदवी तसेच पीएच. डी. प्राप्त केली असून त्यांना अध्यापन, संशोधन तसेच प्रशासन क्षेत्रात व्यापक अनुभव आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या निवडीसाठी राज्यपालांनी संरक्षण संशोधन व विकास संघटनेचे अध्यक्ष तसेच संरक्षण संशोधन व विकास विभागाचे सचिव डॉ. जी. सतीश रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत केली होती. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. अश्विनी कुमार नांगिया आणि राज्याच्या वन विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर हे समितीचे अन्य सदस्य होते. समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या सोमवारी मुलाखती घेतल्यानंतर राज्यपालांनी डॉ. शिर्के यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

## सूचना

# डॉ. डी. टी. शिर्के शिवाजी विद्यापीठाचे नवे कुलगुरू

## १३ व्या कुलगुरूपदी कोल्हापूरच्या सुपुत्राचा बहुमान

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या १३ व्या कुलगुरूपदी विद्यापीठातील सांख्यिकी विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. दिगंबर तुकाराम शिर्के तथा डी. टी. शिर्के यांची नियुक्ती केली. राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी सायंकाळी डॉ. शिर्के यांची आगामी पाच वर्षांसाठी नियुक्तीची घोषणा केली.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाळ १७ जून रोजी संपल्यामुळे हे पद रिक्त होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे कुलगुरूपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला होता. त्यानंतर कुलपती कार्यालयाकडून त्रिसदस्यीय शोध समिती नेमली. कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, मुंबई, औरंगाबाद, नागपूर, नांदेड, बेंगळूर, जेएनयू विद्यापीठातील प्राध्यापक, प्र-कुलगुरू, संशोधक अशा १६९ उमेदवारांनी या पदासाठी अर्ज केले होते. यातून २५ उमेदवारांची निवड मुलाखतीसाठी झाली होती. यापैकी ५ उमेदवारांची नावे शोध समितीने कुलपतींकडे दिली. कुलगुरूंच्या निवडीसाठी राज्यपालांनी डॉ. जी. सतीश रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. अश्विनी कुमार नांगिया आणि राज्याच्या वनविभागाचे प्रधान सचिव मिलींद म्हैसकर अशी त्रिसदस्यीय समिती नेमली होती. सोमवारी या समितीने अंतिम पाच उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. यानंतर राज्यपाल यांनी कुलगुरूपदासाठी डॉ. डी. टी. शिर्के यांच्या नावाची घोषणा केली.

### सर्व घटकांना सोबत घेणार

शिवाजी विद्यापीठाला समृद्ध शैक्षणिक वारसा लाभला आहे. हा वारसा वृद्धिंगत करण्यासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करू, अशी प्रतिक्रिया कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी 'तरुण भारत'शी बोलताना दिली.

### डॉ. दिगंबर तुकाराम तथा डी. टी. शिर्के

- वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले) येथे ११ जून १९६५ रोजी जन्म
- शिक्षण एमएस्सी (संख्याशास्त्र), एमफील, पीएच. डी.
- शिवाजी विद्यापीठातून सांख्यिकी विषयात पदव्युतर पदवी तसेच पीएच. डी.
- पदवी व पदव्युत्तर परीक्षेत विज्ञान शाखेमध्ये विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण
- सध्या शिवाजी विद्यापीठामध्ये संख्याशास्त्र विभागात वरिष्ठ प्राध्यापक पदावर कार्यरत
- अध्यापन, संशोधन तसेच प्रशासन क्षेत्रासह शिक्षण क्षेत्रात ३३ वर्षांचा अनुभव
- विविध पदांवर काम, प्र-कुलगुरु, कुलसचिव, संख्याशास्त्र विभागप्रमुख, अधिसभेसह विविध अधिकार मंडळांवर काम
- विद्यार्थीप्रिय शिक्षक, उत्कृष्ट संशोधक, प्रशासकीय कामाचा अनुभव
- शिवाजी विद्यापीठाचा बृहत आराखडा करण्याची कायदेशीर जबाबदारी पार पाडली
- आंतरराष्ट्रीय सांख्यिकी संस्था, नेदरलॅंड्स या संख्याशास्त्रातील महत्त्वाच्या संस्थेवर कार्यरत

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. डी. टी. शिर्के

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी माजी प्र-कुलगुरू डॉ. दिगंबर तुकाराम तथा डी. टी. शिर्के यांची आज निवड झाली. राज्यपाल तथा कुलपती भगतसिंग कोश्यारी यांनी सायंकाळी पाचला श्री. शिर्के यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली. ते विद्यापीठाचे १३ वे कुलगुरू आहेत. विशेष म्हणजे डॉ. शिर्के यांच्या रूपाने पहिल्यांदाच कोल्हापुरातील व्यक्ती शिवाजी विद्यापीठाची कुलगुरू झाली आहे.

माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची मुदत १७ जूनला संपली. त्यानंतर कुलपतींनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे प्रभारी कुलगुरू म्हणून पदभार सोपविला. तसेच, शोधसमिती गठीत केली. संरक्षण संशोधन व विकास विभागाचे सचिव

पान ७ वर »



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी मंगळवारी डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड झाली. त्यानंतर त्यांच्या पत्नी सुनीता यांनी त्यांना पेढा भरवून हा क्षण साजरा केला.

“ ज्या विद्यापीठात शिकलो, तेथेच कुलगुरू होण्याची संधी मिळाली, ही आनंददायी गोष्ट आहे. सर्वांना बरोबर घेऊन विद्यापीठाला राष्ट्रीय पातळीवर मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. संशोधन, प्रशासन, पायाभूत सुविधा, नवीन अभ्यासक्रम या सर्वच बाबतीत सर्वांनी मिळून पुढचे पाऊल टाकायचे आहे.

– डॉ. डी. टी. शिर्के, नूतन कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

ज्या विद्यापीठाने भाकरी दिली तेथेच सेवेची संधी पान 11 वर »

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. डी. टी. शिर्के

» पान 1 वरून

डॉ. जी. सतीश रेड्डी या समितीचे अध्यक्ष होते. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. अश्विनीकुमार नांगिया, वन विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, आर. के. जैन यांचा समावेश होता.

त्यानंतर कुलगुरुपदाची जाहिरात प्रसिद्ध झाली. संपूर्ण देशभरातून १६१ अर्ज समितीला प्राप्त झाले. या अर्जांची छाननी करून त्यांनी २५ जणांच्या नावांची यादी निश्चित केली व त्यांच्या मुलाखती ऑनलाईन पद्धतीने एका दिवसात घेतल्या. त्यानंतर डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नितीन देसाई, डॉ. अंजली कुरणे, डॉ. अविनाश कुंभार, डॉ. कारभारी काळे या पाच जणांची अंतिम यादी कुलपती कार्यालयाकडे पाठविण्यात आली.

कुलपतींनी काल (ता. ५) या पाचही उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. कुलपती कार्यालयातून आज सायंकाळी पाचला डॉ. डी. टी. शिर्के यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. दोन महिने पाच दिवस ही निवड प्रक्रिया सुरू राहिली.

## विद्यापीठाच्या कुलगुरूंची परंपरा

| | |
|---|---|
| डॉ. ए. जी. पोवार | (१९६२ ते १९७५) |
| बॅ. पी. जी. पाटील | (१९७५ ते १९७८) |
| बी. एस. भणगे | (१९७८ ते १९८०) |
| प्रा. आर. के. कणबरकर | (१९८० ते १९८३) |
| प्रा. के. भोगिश्याना | (१९८३ ते १९८६) |
| प्रा. डॉ. के. बी. पोवार | (१९८६ ते १९९२) |
| प्रा. डॉ. ए. टी. वरुटे | (१९९२ ते १९९५) |
| प्रा. डॉ. डी. एन. धनागरे | (१९९५ ते २०००) |
| प्रा. डॉ. एम. जी. ताकवले | (२००० ते २००४) |
| प्रा. डॉ. एम. एम. साळुंखे | (२००४ ते २००९) |
| प्रा. डॉ. एन. जे. पवार | (२०१० ते २०१५) |
| प्रा. डॉ. देवानंद शिंदे | (२०१५ ते २०२०) |

# ज्या विद्यापीठाने भाकरी दिली, तेथेच सेवेची संधी

**विद्यापीठाचा विद्यार्थी ते कुलगुरू असा डॉ. डी. टी. शिर्के यांचा प्रवास आहे. यापूर्वी त्यांनी विविध पदांवर काम केले. कुलगुरुपदी निवड, विद्यापीठातील आव्हाने आणि भविष्यकालीन योजना याबाबत त्यांच्याशी साधलेला संवाद...**



डॉ. डी. टी. शिर्के



**कुलगुरुपदी निवडीनंतर काय वाटतं?**

**उत्तर** : मी याच विद्यापीठात शिकलो आणि येथेच अध्यापन केले. ज्या विद्यापीठाने भाकरी दिली त्याच्या सेवेची संधीही आज मिळाली. आत्तापर्यंत माझ्यापरीने मी विद्यापीठाच्या वाटचालीत माझे योगदान देत आलो. ज्या पदावर कार्यरत होतो तेथे सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. प्रामाणिकपणाचे फळ म्हणून कुलगुरू पदाचा मान मिळाला. कुलगुरू म्हणून विद्यापीठाचा लौकीक आणखी वाढवण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन काम करणार आहे. कुलगुरू म्हणून काम करणे हे आयुष्याचे संचित आहे.

**विद्यापीठासमोरील आव्हाने कशी पेलणार?**

**उत्तर** : अंतिम वर्षाच्या ऑनलाईन आणि ऑफलाईन परीक्षा हे नजीकचे आव्हान आहे. त्यानंतर होणारे नॅक मूल्यांकन सर्वांत मोठे आव्हान असेल. कारण यावर विद्यापीठाची गुणवत्ता ठरणार आहे. यासाठी त्या दृष्टिकोनातून कार्यवाही करणे आवश्यक आहे. काही महिन्यांपूर्वीपर्यंत प्र-कुलगुरू म्हणून काम केल्याने नॅक तयारीची जवळून माहिती आहे. सर्वांना बरोबर घेऊन आणि सर्वांचे मत विचारात घेऊन आव्हानांना सामोरे जाणे सुकर होईल. याशिवाय कर्मचाऱ्यांचे प्रश्न, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, नव्या शैक्षणिक वर्षाची उशिरा होणारी सुरुवात या आव्हानांना तोंड द्यावेच लागणार आहे. मात्र सर्वांची साथ असल्याने ते अशक्य नाही.

**भविष्यकालीन योजनांविषयी काही संकल्प?**

**उत्तर** : या संस्थेत असणाऱ्या प्रत्येक घटकाशी माझा परिचय आहे. विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, कर्मचारी यांच्यातील क्षमतांची मला जाणीव आहे. त्यांच्या क्षमतांचा उपयोग विद्यापीठ विकासात करून घेणे महत्त्वाचे ठरेल. आंतरविद्या शाखीय विद्यापीठ या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी काही योजना आखल्या जातील. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये, विद्यापीठांचे अधिविभाग येथे मुलभूत संशोधनासाठी साधने उपलब्ध करून देणे. संशोधनाला दिशा देणे तसेच विद्यापीठात होणारे संशोधन, येथील प्राध्यापकांचे शोधप्रबंध यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचा मानस आहे. कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम आणि नवीन विद्याशाखा विद्यापीठात सुरू करून येथील रोजगारक्षमता अधिक कशी वाढेल याकडेही लक्ष देण्याचे ठरवले आहे.

**महत्त्वाकांक्षी योजना काय असतील?**

**उत्तर** : विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील काही भाग हा दुर्गम आहे. या दुर्गमतेमुळे तेथे साधनांची कमतरता आहे. याचा परिणाम तेथील विद्यार्थ्यांच्या जीवनावर होतो. सॅटेलाईट सेंटर सुरू केल्याने तेथील विद्यार्थी आणि विद्यापीठ यांच्यातील अंतर कमी होईल. या सॅटेलाईट सेंटरमुळे खऱ्या अर्थाने ज्ञानाची गंगा या वाड्या-वस्त्यांपर्यंत पोहोचेल. हे सेंटर कार्यान्वित करणे ही माझी महत्त्वाकांक्षी योजना आहे.

**शब्दांकन : ओंकार धर्माधिकारी**

# सर्वांगीण विकास, सर्वसमावेशक प्रशासन चालविण्यावर भर

## नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा मानस; अंतिम वर्ष परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्याचा प्रयत्न

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाचा सर्वांगीण विकास हेच मुख्य ध्येय असून सर्वसमावेशक प्रशासन चालविण्यावर भर राहील, असा मानस नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दै. 'पुढारी'शी बोलताना व्यक्त केला.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून विद्यापीठातील सांख्यिकी विभागाचे वरिष्ठ प्रा. डॉ. शिर्के यांची राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी नियुक्तीची घोषणा केली. त्यानंतर विद्यापीठाची पुढील पाच वर्षांतील वाटचाल व शैक्षणिक धोरणांबाबत भूमिका मांडली.

डॉ. शिर्के म्हणाले, कोरोनामुळे अद्‌भूत परिस्थिती निर्माण झाली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा सर्वांना बरोबर घेऊन यशस्वीपणे पार पाडण्याचा प्रयत्न असणार आहे. शिवाजी विद्यापीठाची 'नॅक'ची ५० टक्के प्रक्रिया पूर्ण झाली असून सेल्फ स्टडी अहवाल सादर करण्यात आला आहे. लवकरच 'नॅक'ची टीम भेट देऊन विद्यापीठाची पाहणी करण्याची शक्यता आहे. विद्यापीठाचे 'नॅक'चे मानांकन उंचावण्यासाठी सर्व घटकांना प्रोत्साहन देऊन त्यांच्याकडून काम करून घेतले जाईल, असे ते म्हणाले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात वेगवेगळ्या आंतर विद्याशाखांमध्ये समन्वय साधून संशोधन व शिकविण्याबाबतच्या गोष्टींची देवाण-घेवाण करण्याचा प्रयत्न राहील. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर केल्या जातील. आंतरविद्याशाखीय व समाज उपयोगी संशोधनास येणाऱ्या काळात जास्त भर दिला जाणार आहे. संशोधन प्रकल्प चांगल्या पद्धतीने पुढे नेण्याचा प्रयत्न असेल. विद्यापीठ पंचवार्षिक आराखड्यात महाविद्यालयांमध्ये सॅटेलाईट सेंटर, स्कील एज्युकेशन, नवीन महाविद्यालये, नवीन कोर्सेस, खेळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सूचना आराखड्यात केल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले.

### आज सूत्रे स्वीकारणार

शिवाजी विद्यापीठाचे १३ वे कुलगुरू म्हणून डॉ. शिर्के यांची निवड झाली आहे. डॉ. डी. टी. शिर्के बुधवारी (दि.७) ते प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडून कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारणार आहेत.

**ज्येष्ठ नागरिकांसाठी विद्यापीठात नवीन व्यासपीठ उभारणार**

ज्येष्ठ नागरिकांसाठी (सिनिटर सिटीजन) यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांच्यासाठी विद्यापीठ स्तरावर व्यासपीठ उभारणार आहे. त्यांची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यासाठी नवीन कोर्स सुरु केला जाणार आहे, असे नूतन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

# कुलगुरूपदावर प्रथमच कोल्हापूरचा सुपुत्र

## डॉ. डी. टी. शिर्के यांचा जन्म, शिक्षण, कारकीर्द करवीरनगरीत : ५५ वर्षात जिल्ह्याला प्रथमच बहुमान

**आशिष आडिवरेकर**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून गेल्या ५८ वर्षांत पहिल्यांदाच कोल्हापूरच्या सुपुत्राला विद्यापीठाच्या कुलगुरू होण्याचा बहुमान मिळाला. डॉ. डी. टी. शिर्के यांची मंगळवारी राज्यपाल कार्यालयाकडून कुलगुरूपदी निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले आणि कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.

कुलगुरूपदासाठी १६९ उमेदवारांनी अर्ज केले होते. यामधून २५ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यानंतर ५ उमेदवारांची नावे निश्चीत केली होती. यामध्ये तीन उमेदवार हे कोल्हापूरचे होते. यामुळे पदाच्या



निवडीमध्ये कोल्हापूरचे पारडे जड होते. यामध्ये डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नितीन देसाई, डॉ. अंजली कुरणे यांचा समावेश होता. तर डॉ. अविनाश कुमार हे इस्लामपूर येथील आहेत. तसेच डॉ. के. वी. काळे हे सातुर्खेड (जि. औरंगाबाद) येथील आहेत.

**प्र. कुलगुरु पद भुषविलेले पहिलेच कुलगुरु**

प्र. कुलगुरु पद भुषविलेली व्यक्ती कुलगुरूपदी होणारे शिर्के हे पहिलेच कुलगुरु ठरले आहेत. अधिविभागातील प्रोफेसर कुलगुरूपदी नियुक्ती होणे हे दुसऱ्यांदा घडले आहे. डॉ. माणिकराव साळुंखे यांनी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात काही वर्षे अध्यापन केले. काही वर्षांनंतर त्यांची कुलगुरूपदी निवड झाली. विद्यापीठामध्ये काही काळ नोकरी करून कुलगुरूपद भुषविण्याचामान वरुटे, साळुंखे, आणि शिर्के यांना मिळाला आहे. तर विद्यापीठातील अधिविभागात सक्रिय असताना थेट कुलगुरूपदी विराजमान होण्याची संधी पहिल्यांदा डॉ. वरुटे आणि आता शिर्के यांना मिळाली आहे.

**कोल्हापूरला पहिल्यांदाच बहुमान**

शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोल्हापूर सांगली, सातारा जिल्ह्यात विस्तारले आहे. विद्यापीठाच्या कुलगुरूपदी यापूर्वी सांगली जिल्ह्यातील ३, बेळगावचे ३, पुणे २, कोकण १, नागपूर १, उस्मानाबाद १ असे १२ कुलगुरु विराजमान झाले होते.

**यापूर्वीचे कुलगुरु व त्यांचा कालावधी**

| कुलगुरु | कालावधी |
|---|---|
| १ डॉ. ए. जी. पवार | १९६२ ते १९७५ |
| २ बॅ. पी. जी. पाटील | १९७५ ते १९७८ |
| ३ डॉ. बी. एस. भणगे | १९७८ ते १९८० |
| ४ प्रा. रा. कृ. कणबरकर | १९८० ते १९८३ |
| ५ प्रा. के. भोगीशायना | १९८३ ते १९८६ |
| ६ डॉ. के. बी. पोवार | १९८६ ते १९९२ |
| ७ डॉ. ए. टी. वरुटे | १९९२ ते १९९५ |
| ८ डॉ. डी. एन. धनागरे | १९९५ ते २००० |
| ९ डॉ. एम. जे. ताकवले | २००० ते २००४ |
| १० डॉ. माणिकराव साळुंखे | २००४ ते २००९ |
| ११ डॉ. एन. जे. पवार | २०१० ते २०१५ |
| १२ डॉ. देवानंद शिंदे | २०१५ ते २०२० |

# शिर्के ठरले कोल्हापूरचे पहिले कुलगुरु

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरुपदावर निवड झालेले डॉ. डी. टी. शिर्के हे कोल्हापूरचे पहिले, तर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील चौथे कुलगुरु ठरले आहेत. ते आज, बुधवारी दुपारी ४ वाजता पदभार स्वीकारणार आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेपासून आतापर्यंत १२ कुलगुरु झाले आहेत. त्यांत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पी. जी. पाटील, माणिकराव साळुंखे, एन. जे. पवार, के. भोगीशयन यांनी कुलगुरुपद भूषविले. या पदासाठी यापूर्वी मूळचे कोल्हापूरचे असणाऱ्या काही प्राध्यापक, प्राचार्यांनी मुलाखती दिल्या. पण, त्यांना यश मिळाले नव्हते. मात्र, यावेळी डॉ. शिर्के यांनी बाजी मारली. ते विज्ञान शाखेशी संबंधित सातवे, विद्यापीठ कॅम्पसवरील तिसरे, तर अधिविभागातील प्राध्यापक (प्रोफेसर) म्हणून काम केलेले दुसरे कुलगुरु ठरले आहेत. त्यांच्यापूर्वी प्रा. वरुटे, डॉ. साळुंखे हे असे कुलगुरु ठरले होते.

## १६९ उमेदवारांमधून मारली बाजी

तत्कालीन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांची मुदत संपल्यानंतर रिक्त झालेल्या पदावर नवीन कुलगुरु निवड प्रक्रिया कुलपती कार्यालयाकडून गेल्या तीन महिन्यांपूर्वी सुरु झाली. त्यासाठी कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी संरक्षण संशोधन व विकास विभागाचे सचिव डॉ. जी. सतीश रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती स्थापन केली होती. या समितीत राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ अश्विनी कुमार नांगिया, राज्याच्या वन विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर हे सदस्य होते. या समितीकडे कुलगुरुपदासाठी १६९ अर्ज दाखल झाले होते. त्यातून या समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्यानंतर कुलपतींनी डॉ. शिर्के यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

## आजपर्यंतचे कुलगुरु

१) डॉ. अप्पासाहेब पवार (बेळगाव)
२) बॅरिस्टर पी. जी. पाटील (कवलापूर, सांगली)
३) प्राचार्य बी. एस. भगणे (कोकण)
४) प्राचार्य रा. कृ. कणबरकर (बेळगाव)
५) प्राचार्य के. भोगीशयन (सोलापूर)
६) प्रा. के. बी. पवार (पुणे)
७) डॉ. ए. टी. वरुटे (निपाणी)
८) प्रा. डी. एन. धनागरे (नागपूर)
९) डॉ. एम. जी. ताकवले (पुणे)
१०) डॉ. माणिकराव साळुंखे (धनगाव, सांगली)
११) डॉ. एन. जे. पवार (आटपाडी, सांगली)
१२) डॉ. देवानंद शिंदे (शिंगोली, उस्मानाबाद)



# अल्पपरिचय

- **नाव :** डॉ. दिगंबर तुकाराम तथा डी. टी. शिर्के. मूळ गाव : वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर)
- **जन्मतारीख :** ११ जून १९६५
- **शिक्षण :** एम. एस्सी. (संख्याशास्त्र), एम. फिल., पीएच. डी.
- **सध्या कार्यरत :** शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक, नेदरलँड्स येथील आंतरराष्ट्रीय सांख्यिकी संस्थेच्या सदस्य.
- **विविध पदांवर काम :** प्र-कुलगुरु, कुलसचिव, संख्याशास्त्र विभागप्रमुख, प्राध्यापक, अधिसभेसह विविध अधिकार मंडळांचे सदस्य.
- **शैक्षणिक अनुभव :** ३३ वर्षे
- **लेखन :** आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय संशोधन पत्रिकांमध्ये सुमारे ८० लेख प्रसिद्ध.
- **संशोधनातील योगदान :** आयआयटी कानपूर, केंद्रीय विद्यापीठ राजस्थान, बंगलोर विद्यापीठ, यूएसएमधील संशोधकांसमवेत संशोधन. पीएच.डी.साठी १४, तर एम. फिल.साठी आठ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.
- **इतर :** विद्यापीठ अधिनियम (२०१६) मधील तरतुदीनुसार परिनियम करण्यासाठी शासन नियुक्त समितीवर काम. विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत् आराखडा करण्यात योगदान.

# वठार तर्फ वडगावात आतषबाजी

## डॉ. शिर्के यांच्या निवडीने आनंदोत्सव

**संजय पाटील** : सकाळ वृत्तसेवा

घुणकी, ता. ६ : हातकणंगले तालुक्यातील वठार तर्फ वडगाव येथील डॉ. डी. टी. शिर्के यांची शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड झाल्याने गावात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. डॉ. शिर्के यांचे प्राथमिक शिक्षण गावातील प्राथमिक शाळेत, माध्यमिक शिक्षण पेठवडगाव येथील वडगाव विद्यालयात, तर यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात बारावीपर्यंत व कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयात पदवीपर्यंतचे शिक्षण झाले. वडील तुकाराम दिगंबर शिर्के यांच्यासह चुलते माजी सरपंच आकाराम शिर्के, (कै.) दिनकर शिर्के व (कै.) शंकर शिर्के, चुलत बंधू, पुतणे असा गोतावळा आहे.

वडील तुकाराम शिर्के यांनी जेमतेम स्थितीत सातवीपर्यंत शिक्षण घेतले. शेती करीत पिठाची गिरणी सुरू केली. शेती आणि पिठाच्या गिरणीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून डॉ. शिर्के, विजया, अरविंद व मधुकर या मुलांना शिक्षण दिले. चौघांनीही वडिलांनी केलेल्या संस्काराचे आणि कष्टाचे चीज केले.

**डॉ. शिर्के माझे चुलतबंधू आहेत. आमच्या जीवनातील परमोच्च आनंदाचा व सुवर्णाक्षरांनी लिहावा, असा क्षण आहे. त्यांना मिळालेले पद गावाच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे.**
**- डी. डी. शिर्के,**
मुख्य औषधनिर्माण अधिकारी, पलूस

डी. टी. शिर्के यांनी चौथी, सातवीसह शिष्यवृत्ती परीक्षांसह अन्य परीक्षांत यश मिळविले. लहान बंधू मधुकर यांच्या शेजारीच घर बांधले असून त्यांचे गावात बऱ्यापैकी वास्तव्य असते. त्यांचा मुलगा कौस्तुभ व मुलगी श्रद्धा उच्चशिक्षित आहेत. डॉ. शिर्के यांच्या भगिनी विजया बंडोपंत कुंभार कोल्हापुरात स्थायिक आहेत. बंधू अरविंद शिर्के हे कोल्हापूर येथे उद्योजक आहेत. वडील तुकाराम शिर्के अरविंद शिर्के यांच्यासमवेत राहतात. सर्वांत लहान बंधू मधुकर यांचा वाठार येथे व्यवसाय आहे. या कुटुंबाकडून संयम, नम्रता शिकण्यासारखी असल्याचे छायाचित्रकार युवराज शिंदे यांनी सांगितले. डॉ. शिर्के यांची निवडीने कुटुंबात आनंदाला सीमा राहिली नाही. कुंभारवाड्यासह गावात आनंदोत्सव साजरा केला.



**वठार तर्फ वडगाव : डॉ. डी. टी. शिर्के यांची कुलगुरुपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे बंधू मधुकर शिर्के यांना पेढा भरविताना युवराज शिंदे. शेजारी सौ. जयश्री शिर्के, श्रुती शिर्के, मयुरेश शिर्के, डी. डी. शिर्के व कुटुंबीय.**

**आमचे बंधू कुलगुरू होतील, याची खात्री होती. मोठ्या पदावर असतानाही गावी ये-जा असते. सर्वांची मनापासून चौकशी करतात. त्यांना गावाबाबत अभिमान आहे. १९९९ मध्ये आईचे निधन झाल्यावर त्यांनी आम्हाला पोरके होऊ दिले नाही. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच उद्योग व्यवसायात स्थिरावलो आहे.**
**- मधुकर शिर्के**, उद्योजक

**वडिलांनी व्यक्त केले समाधान : कुटुंबात आनंदाला भरते; माझ्या आयुष्यातील सर्वांत मोठा आनंद**

# शेतकऱ्याचा मुलगा झाला गुणवत्तेमुळे कुलगुरू

लोकमत न्यूज नेटवर्क



कुलगुरुपदी निवड झाल्याबद्दल डॉ. डी. टी. शिर्के यांना त्यांचे वडील तुकाराम यांनी मंगळवारी कोल्हापूर येथे राहते घरी पेढा भरवून शुभेच्छा दिल्या.

**कोल्हापूर :** गेली साठ वर्षे पिठाची गिरणी चालविणाऱ्या एका सामान्य शेतकऱ्याचा मुलगा गुणवत्तेच्या बळावर आज शिवाजी विद्यापीठाचा कुलगुरू झाला. माझ्या आयुष्यात यापेक्षा मोठा आनंद कोणताच असू शकत नाही, अशा भावना नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे वडील तुकाराम सीताराम शिर्के (वय ८२, रा. वाठार तर्फ वडगाव, ता. हातकणंगले) यांनी मंगळवारी 'लोकमत'शी बोलताना व्यक्त केल्या. आज या आनंदाच्या क्षणी कुलगुरूंच्या आई जिवंत असत्या तर त्या आनंदाने हरखून गेल्या असत्या. तेवढेच मनाला शल्य असल्याची भावना वडिलांनी व्यक्त केली. निवडीची बातमी समजताच त्यांचे घर आनंदात न्हाऊन गेले.

शिर्के हे गावातील पारंपरिक एकर बागायती जमीन; परंतु त्यांचा आजोबापासून गुऱ्हाळांना लागणाऱ्या काहिली व अन्य साहित्य भाड्याने व विकत देण्याचा व्यवसाय आहे. त्याच्या जोडीलाच साठ वर्षांपासूनच त्यांची पिठाची गिरणी, तेलघाणा, चटणी-कांडप असे एकत्रित युनिट आहे. त्यांचे वडील या वयातही शेती व गिरणीत लक्ष घालतात. उद्यमशीलता त्यांच्यात वारशाने आली आहे. वडील आईचे २० वर्षांपूर्वी निधन झाले आहे. नूतन कुलगुरू शिर्के यांच्या पत्नी सुनीता या कऱ्हाडजवळच्या कोळेवाडी गावच्या. त्या विवेकानंद कॉलेजमध्ये रसायनशास्त्राच्या प्राध्यापिका आहेत.

डी. टी. शिर्के हे अभ्यासात सुरुवातीपासूनच पुढे राहिले. शाळेपासून विद्यापीठापर्यंत त्यांनी कधी पहिला क्रमांक सोडलेला नाही. ज्या विद्यापीठात त्यांचे शिक्षण झाले, मिळाली आहे. त्यांनी स्वत:चे भवितव्य स्वत: घडविले. संख्याशास्त्रातूनच एम. एस्सी. केले तेव्हा आम्हांला केवढा अभिमान वाटला होता, असेही वडिलांनी सांगितले. शिर्के यांना अपार कष्ट करण्याची सवय आहे, असे त्यांचे भाऊ अरविंद यांनी सांगितले. अरविंद शिर्के यांचा अर्थमूव्हिंग मशिनरीसाठी लागणारी सील उत्पादन विक्रीचा व्यवसाय आहे. धाकटे भाऊ मधुकर हे

## वडणगेत बालपण

नूतन कुलगुरू डॉ. शिर्के यांचे आजोळ करवीर तालुक्यातील वडणगे. गोविंद पांडुरंग कुंभार हे त्यांचे मामा. त्यामुळे त्यांचे लहानपण वडणगे येथेही गेले. वडणगेशी असलेला हा जुना ऋणानुबंध डॉ. शिर्के यांनी अजूनही जपला आहे.

## शुभेच्छांचा वर्षाव अन् जल्लोष

कुलगुरुपदाच्या अंतिम पाच उमेदवारांमध्ये कोल्हापूरशी संबंधित असलेल्या डॉ. शिर्के, नितीन देसाई आणि अंजली कुरणे यांचा समावेश होता. कोल्हापूरच्या उमेदवाराला यावेळी संधी मिळावी, अशी विद्यापीठाच्या विविध घटकांची अपेक्षा होती. त्यांतील डॉ. शिर्के यांची निवड झाल्याचे समजताच त्यांच्यावर विद्यापीठाच्या घटकांसह इतरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. दरम्यान शिर्के यांच्या मूळ गावी वाठार येथे जल्लोष करण्यात आला.

शिर्के यांना प्रशासकीय कामाचा उत्तम अनुभव आहे. त्यांच्याकडे उत्तम शैक्षणिक गुणवत्ताही आहे. त्यामुळे त्यांचा समन्वय साधून ते सगळ्यांना सोबत घेऊन विद्यापीठाला पुढे घेऊन जातील. शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय मानांकनात पहिल्या शंभरमध्ये यावे, यासाठीच त्यांनी लक्ष्य घेऊन काम करावे त्यासाठी त्यांना लागेल ती मदत व सहकार्य करू.

- **संजय डी. पाटील**, अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी

डॉ. शिर्के कुलगुरु झाले ही अतिशय चांगली निवड आहे. अधिकारपद न मिरवणारा साधा माणूस असाच आमचा त्यांचा आजपर्यंतचा अनुभव आहे. त्यांची वृत्ती सहकार्याची आहे. कोल्हापूरचा माणूस पहिल्यांदाच कुलगुरु झाला याचा आनंद आहेच. आमचे त्यांना पूर्ण सहकार्य राहील. त्यांनी विद्यापीठाचा नावलौकिक वाढवावा.

- **बाबा सावंत**, अध्यक्ष , शिवाजी विद्यापीठ सेवक संघ.

डॉ. शिर्के यांच्या निवडीचे आम्ही स्वागत करतो. विद्यापीठातील विविध पदांवर त्यांनी चांगले काम केले आहे. त्यांना विद्यापीठाची प्रकृती माहीत आहे. त्यांच्या कारकिर्दीमध्ये विद्यापीठाची निश्चितपणे प्रगती होईल. आमचे त्यांना पूर्ण सहकार्य राहील.

-**डॉ. क्रांतिकुमार पाटील**, अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ प्राचार्य संघटना

शैक्षणिक गुणवत्ता व प्रशासनाची जाण असलेली अत्यंत उत्तम व्यक्ती कुलगुरु म्हणून मिळाली. त्यांनी प्र-कुलगुरु व कुलसचिव या दोन्ही पदांवर चांगले काम करुन दाखविले आहे. कोल्हापूरचा कुलगुरु मिळाला याबद्दलही नक्कीच आनंद आहे.

- **वसंतराव मगदूम**, संस्थापक अध्यक्ष, विद्यापीठ कर्मचारी संघ

नवीन कुलगुरुंनी विद्यापीठ कायदा आणि परिनियमांनुसार विद्यापीठाचा कारभार करावा, ही अपेक्षा आहे.

- **डॉ. सुभाष जाधव**, सहकार्यवाह, 'सुटा'

# विद्यार्थी वसतिगृह ते कुलगुरू दालन

## डॉ. शिर्के यांचा झळाळता जीवनप्रवास

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाची संधी मिळावी, यासाठी कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली. आज याच ग्रामीण भागातील एक विद्यार्थी कुलगुरुपदी विराजमान झाला आहे. ज्या विद्यापीठात शिकले, त्याच विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून ते काम करतील. हा जीवनप्रवास आहे डॉ. दिगंबर तुकाराम तथा डी. टी. शिर्के यांचा. त्यांची संपूर्ण शैक्षणिक कारकीर्द विद्यापीठाशी निगडित असून, विद्यापीठाच्या प्रगतीत त्यांचे योगदान आहे.

डॉ. शिर्के यांचा जन्म ११ जून १९६५ ला झाला. ते मूळचे हातकणंगले तालुक्यातील वाठार तर्फ वडगाव येथील. महाविद्यालयीन शिक्षण घेतल्यावर ते उच्चशिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठात आले. येथे त्यांनी संख्याशास्त्रात एम.एस्सी केले. याच विद्यापीठात त्यांनी एम.फील, पीएच. डी. केली. पुढे येथेच ते सहाय्यक प्राध्यापक म्हणून रुजू झाले. पुढे प्राध्यापक, वरिष्ठ प्राध्यापक, विभाग प्रमुख म्हणून त्यांनी काम केले. ज्या वसतिगृहात ते विद्यार्थिदशेत राहिले त्याच वसतिगृहाचे पुढे ते रेक्टर झाले. प्रभारी कुलसचिव, प्र-कुलगुरू यांसह त्यांनी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळांवर काम केले. आज कुलगुरूपदी निवड झाल्यानंतर त्यांनी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

### डॉ. शिर्के यांची कारकीर्द

- पदवी व पदव्युत्तर पदवी परीक्षेत विज्ञान शाखेत विद्यापीठात प्रथम
- यूजीसी-सीएसआयआर संस्थेची संशोधन फेलोशिप. इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्स बंगळूर संस्थेची फेलोशिप
- नेदरलँड येथील आंतरराष्ट्रीय सांख्यिकी संस्थेचे सदस्य
- संख्याशास्त्र अधिविभागात ३० वर्षे कार्यरत.
- यूजीसी व डीएसटी अशा संस्थांद्वारे राष्ट्रीय दर्जाची प्रयोगशाळा
- संख्याशास्त्रातील संशोधनात योगदान. १४ पीएच.डी. व आठ एम.फिल. विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक
- नामांकित संशोधन पत्रिकेत त्यांचे ८० हून अधिक लेख प्रसिद्ध

# अधिविभागातील प्राध्यापकास कुलगुरू होण्याचा दुसऱ्यांदा मान

## प्र-कुलगुरूपद भूषविलेले डॉ. शिर्के पहिलेच कुलगुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी सांख्यिकी विभागातील वरिष्ठ प्राध्यापक व माजी प्र-कुलगुरू डॉ. दिगंबर तुकाराम शिर्के तथा डी. टी. शिर्के यांची नियुक्ती झाली आहे. विद्यापीठाच्या इतिहासात विद्यापीठ अधिविभागातील प्रोफेसर यांची कुलगुरूपदी नियुक्ती होण्याचा दुसऱ्यांदा मान मिळाला आहे. यापूर्वी प्राणीशास्त्र विभागातील प्रोफेसर ए. टी. वरुटे यांची विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाली होती. विद्यापीठात प्र-कुलगुरूपद भूषविलेली व्यक्ती कुलगुरूपदी निवड होणारे शिर्के हे पहिले ठरले.

**प्रा. डॉ. शिर्के यांची शैक्षणिक वाटचाल व योगदान**

डॉ. शिर्के हे मूळचे वाठार तर्फ वडगाव (ता. हातकंणगले) येथील असून, त्यांचा जन्म ११ जून १९६५ रोजी झाला. शिवाजी विद्यापीठ येथे संख्याशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण व डॉक्टरेट पदवी व पदव्युत्तर पदवी परीक्षेत विज्ञान शाखेमध्ये विद्यापीठामध्ये प्रथम क्रमांकाने ते उत्तीर्ण झाले. शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात ३० वर्षे कार्यरत व ९ वर्षे अधिविभागाचे प्रमुखपद त्यांनी सांभाळले आहे. त्यांच्या अध्यापन व संशोधन कार्याची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाने गुणवंत शिक्षक पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित संशोधन पत्रिकेमध्ये त्यांचे ८० हून अधिक लेख प्रसिद्ध झाले आहेत. संख्याशास्त्र विषयातील संशोधन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान असून, १४ पीएच. डी. व ८ एम. फिल. विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

**विविध मंडळांवर प्रभावी काम**

अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्याशाखा, अभ्यास मंडळे, स्थायी समिती अधिष्ठाता मंडळ, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, अंतर्गत गुणवत्ता नियंत्रण कक्ष, वित्त व लेखा समिती, खरेदी समिती, विक्री समिती, वसतिगृह सल्लागार समिती, लेखापरीक्षण समिती, ग्रंथालय समिती इतर समिती व अधिकार मंडळावर प्रभावीपणे व अभ्यासपूर्वक कार्य केले आहे. शिवाजी विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत आराखडा करण्याची कायदेशीर जबाबदारी यशस्वीपणे त्यांनी पार पाडली आहे.

**विविध उपक्रम राबविले**

इंडियन ॲकॅडमी व सायन्स, बेंगलोर या राष्ट्रीय संस्थेची फेलोशिप आंतरराष्ट्रीय सांख्यिकी संस्था, नेदरलँडस् या संख्याशास्त्रातील महत्त्वाच्या संस्थेचे इलेक्टेड मेंबर आहेत. यूजीसी व डीएसटी अशा संस्थांचे विविध उपक्रम, प्रकल्प राबवून विभागाला निधी व राष्ट्रीय दर्जाची प्रयोगशाळा उभारणी केली.

### शैक्षणिक गुणवत्तेबद्दल दोनवेळा सन्मान

संशोधन कार्य व शैक्षणिक कार्यासाठी देशातील नामांकित संस्था व जर्मनी, अमेरिका, थायलंड, पोर्तुगाल, सिंगापूर, स्वित्झर्लंड व मलेशिया या देशांना भेटी व निमंत्रित म्हणून व्याख्याने दिली आहेत. शैक्षणिक गुणवत्तेबद्दल जवाहरलाल नेहरू मेमोरिअल फंड, नवी दिल्ली संस्थेने दोन वेळा सन्मानित केले आहे. अध्यापन, संशोधन आणि प्रशासकीय तीनही पातळीवरील कामगिरी त्यांच्यासाठी जमेची बाजू आहे. विद्यापीठातील सर्व घटकांना सोबत घेऊन कामकाज करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

# डॉ. शिर्के यांच्या निवडीचे वाठारात स्वागत

**किणी : पुढारी वृत्तसेवा**

वाठार तर्फ वडगाव (ता. हातकणंगले) येथील डॉ. डी. टी. शिर्के यांची शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड झाल्याचे वृत्त धडकताच गावात आनंदाचे वातावरण पसरले. फटाक्यांची आतषबाजी करत डॉ. शिर्के यांच्या निवडीचे स्वागत करण्यात आले.

कुटुंबात ज्येष्ठ असणाऱ्या डॉ. शिर्के यांचे प्राथमिक शिक्षण गावातील शाळेत, वारणेतील वडगाव माध्यमिक विद्यालयात आणि कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयात उच्च शिक्षण झाले. वडील तुकाराम शिर्के यांनी प्रतिकूल परिस्थितीत सातवीपर्यंत शिक्षण घेतले. शेती व पिठाची गिरणी या व्यवसायातून दिगंबर शिर्के, विजयमाला, अरविंद व मधुकर या मुलांना उच्च शिक्षण दिले.



**वाठार : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे बंधू मधुकर शिर्के यांचे पेढे भरवून अभिनंदन करताना युवराज शिंदे. शेजारी शिर्के कुटुंबीय.**

डॉ. शिर्के यांनी नोकरी पत्करली. अरविंद शिर्के हे कोल्हापूर येथे उद्योजक आहेत, तर लहान बंधू मधुकर यांची वाठार येथे रबर फॅक्टरी आहे. बहीण विजया कुंभार कोल्हापूर येथे स्थायिक आहेत.

डॉ. शिर्के यांचे बंधू मधुकर शिर्के यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, ज्येष्ठ बंधू कुलगुरू म्हणून विराजमान झाले हा आमच्या कुटुंबातील सर्वोच्च आनंदाचा क्षण आहे.